प्र. क्र.	अनुक्रमणिका
१.	प्रस्तावना
२.	पंडित जवाहरलाल नेहरू यांची जडण - घडण
३.	भारतीय स्वातंत्र्य लढा आणि त्यातील पंडित जवाहरलाल नेहरुंचे योगदान
४.	पंडित जवाहरलाल नेहरुंचे स्वातंत्र्योत्तर भारताच्या राजकीय विकासातील योगदान
५.	पंडित जवाहरलाल नेहरू आणि त्यांचा दूरदृष्टीपणा
६.	नेहरू कालखंडातील भारत आणि इतर देशांशी असलेला संबंध
७.	पंडित जवाहरलाल नेहरूंच्या ध्येय धोरणांची आजची प्रस्तुतता
८.	समारोप आणि निष्कर्ष

<u>“आधुनिक भारताच्या जडण – घडणीत पंडित जवाहरलाल नेहरूंचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास”</u>

प्रस्तावना :

आधुनिक भारताच्या जडण – घडणीत पंडित जवाहरलाल नेहरूंचे योगदान अनन्य साधारण आहे. पंडित जवाहरलाल नेहरू हे असामान्य, प्रभावी लोकोत्तर व्यक्तिमत्व होते. नेहरू यांची ओळख एक स्वातंत्र्य आंदोलनातील नेता, भारताचे पंतप्रधान, एक मुत्सदी व आंतरराष्ट्रीय प्रतिमा असणारा मानवतावादी नेता अशी आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांचा कालखंड प्रामुख्याने दोन भागात विभागण्यात येते, एक स्वातंत्र्य प्राप्तीसाठी झगडणारे नेहरू आणि दुसरे म्हणजे स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारताला जगाच्या पाठीवर एक नवे लोकशाही राष्ट्र घडविणारे नेहरू, अशा दोन्ही पातळीवरील त्यांचे कार्य अभ्यासण्यात येते. पंडित नेहरूंना जेवढी लोकप्रियता लाभली तेवढाच त्यांना विरोधही सहन करावा लागला. त्यांच्या ध्येय धोरणावर व एकूण कार्यावर मोठ्या प्रमाणात टीकाही करण्यात आली. थोडक्यात नेहरूंच्या धोरणाचे समर्थक आणि विरोधक आजही आहेत.

तत्कालीन परिस्थितीत नेहरू म्हटले की, आपणापुढे गांधीजीचा एक उत्तरार्धी आणि भारताचा वारस या दृष्टीने देखील लक्ष गेल्यावाचून राहत नाही. आजच्या पिढीला पंडित नेहरू म्हणजे गांधीजींचाच एक विचार वाटतो पण मुळात जेव्हा आपण नेहरूंना अभ्यासू लागतो तेंव्हा नेहरूजी आणि गांधीजी हे वेगवेगळे व्यक्तिमत्व होते हे दिसून येते. पंडित नेहरुंने गांधीजीचा वारसा किंवा मोतीलालजी यांच्या विचाराचे नेहमीच समर्थन केले असे नाही. दोघातही विरोधाभास होताच. तरीही नेहरूजी गांधीजींना आपला राजकीय गुरूच मानत असत. तत्कालीन कॉंग्रेस मध्ये आधुनिक व विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन मांडणारे एकमेव नेते म्हणून पंडित जवाहरलाल नेहरुंच होते. हे आपणास मान्यच करावे लागते.

पंडित नेहरू हे अत्यंत महत्वकांक्षी व्यक्तिमत्व होते. नेहरूंचे राजकारण हे राजकारण नसून समाजकारण असे. भारताच्या विकासाचे आणि स्वातंत्र्याची खरी तळमळ असणारे नेहरू हे होते. ते उच्च विद्याविभूषित होते. त्यामुळे भारतातील बुद्धीजीवी लोकांना त्याच्या बद्दल आदरच होता. भारतीय इतिहास, संस्कृती, परंपरा यांचा वारसा जतन करून प्रवाहित करणारे नेते होते. म्हणून नेहरूजी प्रचंड जनसमूदायाचे प्रणेते बनले. विद्यार्थ्यांचे व लहानांचे ते तर चाचा नेहरुच होते. ह्या सर्व जमेच्या बाजूमुळे त्यांना प्रचंड

लोकप्रियता भारता बरोबरच आंतरराष्ट्रीय पातळीवर लाभली. त्याच कारणामुळे त्याचा आंतरराष्ट्रीय व मानवतावादी पींड बनला.

पंडित नेहरूंना भारताला एक जागतिक महासत्ता म्हणून उभे करावयाचे होते. आणि त्यात त्यांना बरेचसे यश देखील प्राप्त झाले. स्वातंत्र्यापूर्व कालखंडापासूनच नेहरूंचा भारतावर प्रभाव राहिला. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत कार्यरत असतांना भारताची भविष्यकालीन वाटचाल कशी राहील याबदलची रूपरेषा त्यांच्याकडे होती. तसेच स्वातंत्र्य प्राप्ती नंतर पंतप्रधान पदावर कार्यरत असताना ती रूपरेषा भारताचे 'व्हिजन' म्हणूनच समोर आली. नेहरू अनेक ठिकाणी भाषणे, व्याख्याने देत, त्यातून त्यांच्या विचारांचा दूरदृष्टीपणा दिसून येत. एकाच प्रश्नाकडे वेगवेगळ्या नजरेतून बघण्याची दृष्टी नेहरुंचीच होती. म्हणून भविष्यकालीन घटनांचा अंदाज बाधण्याची क्षमता त्यांच्यात होती.

भारताच्या परराष्ट्र धोरणावर नेहरुंचाच विशेष प्रभाव दिसून येतो. गांधीजी देखील परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात एखाद्या प्रश्नाला उत्तर देतांना नेहरुनांच पुढे करत. आज पर्यंत भारताचे परराष्ट्र धोरण हे नेहरूंचेच परराष्ट्र धोरण होते म्हणूनच, त्यांना परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार असे म्हणतात. भारताला महासत्ता प्रधान राष्ट्र बनविण्याकरिता नेहरुंनी परराष्ट्र धोरण आखलेले होते. यातूनच नेहरूंचा दूरदृष्टीपणा दिसून येतो. नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाला बऱ्याच प्रमाणात यश आले काही बाबतीत अपयश आले ते का? हे अभ्यासाअंती समजून येईलच.

अलिप्ततावादाचा निर्णय घेऊन नेहरूंनी जगात भारताच्या सार्वभौमत्वाचे रक्षणच केले नाही तर आमच्या मताला सुध्दा आंतरराष्ट्रीय राजकारणात वाव आहे, हे दाखवून देण्याचे कार्य केले. याच आधारावर तिसरे जग (अविकसित राष्ट्राचा समुच्चय) निर्मितीचे कार्य नेहरूंच्या परराष्ट्र धोरणात होते काय ? हे पाहावे लागेल.

आधुनिक भारताची जडण – घडण बघत असतांना आपणास स्वातंत्र्य पूर्व कालखंडातील भारताचे चित्रण करणे महत्त्वाचे ठरते. भारत हा शेतीप्रधान देश आहे. भारताची जनता जवळपास ७०% ही शेती व शेतीजन्य व्यवसायावर अवलंबून होती. पण आधुनिक भारतात हे प्रमाण ५५% वर येऊन पोहचले आहे ही बाब औद्योगिक विकासातून समोर आली का ? स्वातंत्र्य पूर्व भारतात दारिद्र्य, प्रचंड प्रमाणात बेरोजगारी, मागासलेपणा, आर्थिक विषमता, शैक्षिणिक सुविधांचा अभाव, सामाजिक रूढी –

प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा ह्या अस्तित्वात होत्या. यासर्व बाबीची सोडवणूक झाल्याशिवाय आधुनिक भारताची पायाभरणीच होणार नव्हती. त्यासाठी नेहरूंचा विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन कितपत उपयुक्त ठरला?

स्वातंत्र्यापूर्वी भारतात सामाजिक सुधारणा आणि राजकीय स्वातंत्र्य अशा दोन्ही पातळीवर चळवळी अस्तित्वात होत्या. भारतावर ब्रिटीशांचे १०० – १५० वर्ष सत्ता होती. या काळात ब्रिटिशांनी स्वतःच्या सुख – सोयी साठी काही सुधारणा केल्या होत्या. त्या सुधारणा नेहरूंना भारताचा पायाभूत विकास म्हणून उपयुक्त ठरल्या का? विकासाचा आधारभूत घटक म्हणून शेती क्षेत्राकडे बघावे लागते. नेहरूंच्या पंचवार्षिक योजनेतून शेती क्षेत्रात नेहरू कसा विकास साध्य करू पाहत होते. त्यात नेहरू नीतीची प्रस्तुतता काय राहिली? भारतात औद्योगिक संधी स्वातंत्र्यापूर्वी नव्हत्यातच जमा होती. नेहरूंच्या धोरणातून त्यात कितपत विकास क्रम मार्गी लागला त्यात गांधी प्रणीत स्वयंपूर्ण खेडे आणि लहान – सहान यंत्रांचे काय स्थान राहिले. त्यातून आधुनिक भारताची घडवणूक कशी झाली. भारतात दारिद्र्य, बेकारी, उपासमार, शैक्षणिक सुविधांचा अभाव, राजकीय अज्ञान, आर्थिक कमकुवता असतांना लोकशाही रुजविण्यासाठी कसे प्रयत्न करावे लागले त्यात नेहरू विचाराची उपयोजन कसे झाले?

एकंदरीत आलिप्ततावाद, परराष्ट्र धोरण, पंचवार्षिक योजना, लोकशाही समाजवाद, धर्मनिरपेक्षता, पंचायतराज व्यवस्था, संसदीय लोकशाही, संमिश्र अर्थव्यवस्था, नियोजन आयोग इ. धोरणातून भारताची आजपर्यंतची जडण – घडण कशी झाली व त्यात नेहरू विचारांची प्रस्तुतता कशी राहिली. ही अभ्यासाअंती समोर येईलच?

नवस्वातंत्र्य भारतीय जनतेला आपल्या समोरील आव्हानाचे एका शब्दात सोडवणूक हवी होती. आणि ते लवकर शक्य नव्हते त्यास ठराविक कालखंड जाऊ देणे गरजेचे होते त्यामुळे ते लवकर साध्य होऊ शकली नाहीत. त्यामुळे नेहरू विचार धारेवर नेहरूंचा स्वप्नाळू किंवा आदर्शवाद यावरच टीकाकार विवेचन करतात. तसे न करता नेहरूंच्या विचारांची चर्चा, मूल्यमापन यथासांग पणे व्हावे याच करिता नव्याने विचारमंथन व्हावे, हाच उद्देश समोर ठेऊन प्रस्तुत संशोधन विषय म्हणून "**आधुनिक भारताच्या जडण – घडणीत पंडित जवाहरलाल नेहरूंचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास**" हा विषय निवडला आहे.

विषयाची निवड :

स्वातंत्र्य भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू म्हणून त्याच्या समोर असंख्य समस्या उभ्या होत्या. त्या सर्व समस्याचे स्वरूप व्यापक आणि गुंतागुंतीचे होते. ह्या समस्या ब्रिटीशांच्या काळापासून जाणून - बुजून रुजवल्या होत्या. तश्याच काही भारतीय परंपरा – चालीरीती यातून निर्माण झाल्या होत्या.

लोकांची इच्छा अगदीच साधी आणि एका वाक्यात संपणारी होती त्यांना सर्व प्रश्नाची तत्काळ आणि समाधानकारक सोडवणूक हवी होती. कोणत्याही नव स्वतंत्र्य देशातील जनतेची आतुर आणि उत्कृष्ट इच्छा असते आणि तसी भारतीयांची होती. जनतेच्या अपेक्षा या होत्या या बद्दल त्यांना दोष देण्याचे कारण नाही, पण या अपेक्षा पूर्ण करता येणे मानवी शक्यतेच्याही पलीकडचे होते. नेहरूंचे मोठेपण असेल तर ते यात आहे की स्वातंत्र्य पूर्व काळापासून भारतासमोरील प्रश्नांचा त्यांनी विचार सुरु केलेला होता. स्वतःच्या मनाशी त्यांनी त्या प्रश्नाच्या उलगड्यासाठी काही दिशा निश्चित केलेल्या होत्या. त्याच मुळे आज आपणास भारताचा आधुनिक चेहरा – मोहरा बघण्यास मिळतो त्याचे श्रेय फक्त आणि फक्त पंडित जवाहरलाल नेहरूंनाच द्यावे लागते. याकरिता त्यांनी क्रमबद्ध विकास कार्यक्रम राबविला होता. पंचवार्षिक योजनांचा स्वीकार, संसदीय लोकशाही, अलिप्ततावाद, संमिश्र अर्थव्यवस्था, धर्मनिरपेक्षता, लोकशाही समाजवाद, औद्योगिक धोरण, पंचायतराज व्यवस्था, शेती क्षेत्राच्या विकास साधने याद्वारे क्रमबद्ध विकास सहजशक्य झाला. हवा तसा विकास साधण्याकरिता कमीत कमी २० – २५ वर्ष विश्वशांतीची आवश्यकता होती पण ती लाभली नाही. भारत – चीन व भारत – पाक या युद्धात भारताची आर्थिक झीज झाली होती. त्यामुळे पंचवार्षिक योजनेतील अनपेक्षित खर्च युद्धावर करण्यास भाग पडले. तसे झाले नसते तर आज पेक्षा वेगळे विकसित स्वरूप पहावयास मिळाले असते. एकंदरीत नेहरूंचे नेतृत्व वाद रहित राहण्याचा संभव फार कमी आहे. पण नेहरूंच्या विचाराची आजही प्रस्तुतता आहे, म्हणून या विचाराचे योग्य मूल्यमापन व्हावे व योग्य चिकित्सा घडावी, या उद्देशाने अभ्यासकाने **'आधुनिक भारताच्या जडण – घडणीत पंडित जवाहरलाल नेहरूंचे योगदान: एक चिकित्सक अभ्यास'** या विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधनाचा उद्देश :

१. पंडित जवाहरलाल नेहरूंचे प्रगतीशील भारत घडविण्या संदर्भातील विचार व कार्य अभ्यासने.

२. धर्मनिरपेक्षता, परराष्ट्र धोरण, लोकशाही समाजवाद, अलिप्ततावाद इ. प्रमुख मुल्याबाबत पंडित नेहरूंच्या विचारांचा अभ्यास करणे.

३. पंडित नेहरूंच्या धोरण नीतीचा राष्ट्राच्या पुढील वाटचाली वरील प्रभाव तपासणे.

४. भारतीय राज्यघटने वरील पंडित नेहरूंच्या विचारांचा प्रभाव कसा राहिला याचा शोध घेणे.

५. परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून पंडित नेहरूंच्या विचारांचा आढावा घेणे.

६. नेहरू विचारधारेच्या अनुकरणातून भारताची आजची आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रतिमा स्पष्ट करणे.

७. भारताच्या विकासात नेहरू प्रणीत औद्योगिक व कृषी क्षेत्राच्या विकासाची उपयुक्तता तपासणे.

संशोधनाची गृहीतके :

१. पंडित नेहरूंनी आधुनिक भारताच्या जडण – घडणीत पायाभूत स्वरूपाचे योगदान दिले.

२. पंडित नेहरूंनी अवलंबलेल्या अलिप्ततेच्या धोरणामुळेच भारत जागतिक पातळीवर नेतृत्व स्थानी आला.

३. पंडित नेहरूंचे विचार आज आंतरराष्ट्रीय पातळीवर अनुकरणीय आहेत.

४. पंडित नेहरूंनी संसदीय लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार करून जबाबदार शासन प्रणाली स्वीकारली.

५. पंडित नेहरूंनी धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार करून धर्मा - धर्मात धार्मिक सहिष्णुता निर्माण केली.

६. पंडित नेहरूंनी संमिश्र अर्थव्यवस्थेच्या स्वीकारातून मजबूत अर्थव्यवस्था बनवण्याचा प्रयत्न केला.

७. पंडित नेहरूंच्या पंचवार्षिक योजना द्वारे क्रमबद्ध विकास कार्य पार पाडण्यात मदत झाली.

८. पंडित नेहरूंच्या औद्योगिक धोरणांच्या स्वीकारातून भारताने समृद्धीकडे वाटचाल करण्यास प्रारंभ केला.

९. पंडित नेहरूंचे प्रशासन कर्त्यव्यनिष्ठ प्रशासन म्हणून नावारूपास आले.

१०. पंडित नेहरूंनी भारतात लोकशाही रुजविण्याचे कार्य केले.

पूर्व संशोधनाचा आढावा :

१. ‘पंडित नेहरू : एक मागोवा’ डॉ. ना. गो. राजूरकर व डॉ. नरहर कुरुंदकर यांनी आपल्या पीएच. डी. च्या शोधाप्रबंधाचे पुस्तक रुपात प्रकाशन केले आहे. नेहरू प्रणीत विचारधारेने भारतीय जनतेवरील प्रभुत्वाने आणि नेहरू नंतर विचारधारेत झालेला गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला आहे.

२. २००१ मध्ये ‘प्रा. संजीवन माणिकराव कदम’ यांनी ‘नेहरूंची समाजवादी संकल्पना व राजकीय अर्थकारण’ हा पीएच. डी. चा शोधप्रबंध डॉ. भूषणकुमार जोगुलरवार यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केला. प्रस्तुत शोध प्रबंधात नेहरूंची समाजवादी संकल्पना, समाजवादी संकल्पनेचा गतइतिहास, उदय, विकास, समाजवादी विचारधारेचे प्रकार आणि नेहरू प्रणीत समाजवादी संकल्पना व आजचे राजकीय अर्थकारण यांची सांगड घातली.

३. २००४ मध्ये ‘प्रा. महादेव हरिदास गव्हाणे’ यांनी ‘भारत – पाक सबंध : विशेष संदर्भ काश्मिर प्रश्न’ या शीर्षकाखाली पीएच. डी. चा शोधप्रबंध डॉ. भूषणकुमार जोगुलरवार यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केला. सदरील प्रबंधात भारत – पाक सबंध, फाळणीचे राजकारण, ३७० कलमान्वये काश्मिरला दिलेले झुकते माप आणि काश्मिर प्रश्नाचे पाकिस्तान राजकीय भांडवल म्हणून कसे वापर करीत आहे, तसेच काश्मिर प्रश्न आणि ३७० कलामांच्या अनुषंगाने पंडित जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाचा आढावा घेतला.

४. २०१४- २०१५ मध्ये प्रस्तुत संशोधकाने ‘आधुनिक भारताच्या जडण – घडणीत पंडित जवाहरलाल नेहरूंचे योगदान : एक विवेचक अभ्यास’ हा एम. फील. चा लघु शोधप्रबंध डॉ. अशोक सिध्देवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केला. प्रस्तुत शोध प्रबंधात नेहरूंच्या एक – एका विचारांचे सद्यकालीन उपयोजन आणि आधुनिक भारताच्या जडण – घडणीत त्यास कसे यश – अपयश मिळाले याची चिकित्सा केली आहे. सद्यकालीन परिस्थितीत नेहरू विचारधारेच्या प्रस्तुततेचा आढावा घेतला.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी संशोधकाने ऐतिहासिक, वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, अन्वेषनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

तथ्य संकलन :

सामाजिकशास्त्रात तथ्य संकलनाचे प्रमुख दोन प्रकार पडतात. त्यामध्ये प्राथमिक साधने व दुय्यम साधने ही होत.

I. **प्राथमिक साधने :**

'पंडित जवाहरलाल नेहरू' यांचे गोरेद्वारा अनुवादित आत्मकथा, पंडित जवाहरलाल नेहरू लिखित 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया,' 'गील्पेस ऑफ वर्ल्ड हिस्टरी,' 'जवाहरलाल नेहरू मेमोरिल फॅन्ड' यांच्या संपादित व्हालूमचा वापर करण्यात येईल.

II. **दुय्यम साधने :**

संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, लेख, इंटरनेट इत्यादी साधनाचा वापर करण्यात येईल.

संशोधन आराखडा :

प्रस्तुत शोधप्रबंधाचा संशोधन आराखडा पुढील प्रमाणे असेल.

प्रकरण १. प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाची पूर्व प्राथमिक रूपरेषा, संशोधन समस्या, अभ्यास विषय, प्रस्तावना, संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधनाची गृहीतके, संशोधनाचे महत्व, पूर्व संशोधनाचा आढावा, संशोधन पध्दती, तथ्य संकलनाची साधने व प्रकरण नियोजनाची मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण २. पंडित जवाहरलाल नेहरू यांची जडण – घडण

प्रस्तुत प्रकरणात पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कुटुंबाची पार्श्वभूमी, गत इतिहास, त्यांचे बालपण, कुटुंबातील झालेले संस्कार, देशातील व विदेशातील शिक्षण, विद्यार्थी दशेतील विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन, शालेय जीवनातील राजकीय परिस्थितीचे ज्ञान, उदारमतवादी व्यवस्थेचा परिचय त्यांच्या घरातील लोकांचे, राजकारणी, वकील, अधिकारी यांचे जाणे – येणे, तत्कालीन भारताची परिस्थिती, वाचनातील ग्रंथ, त्यांना

लाभलेला सहवास या सर्व एकंदरीत बाबीतून पंडित जवाहरलाल नेहरू यांचा निर्माण झालेला पिंड, त्याच्या भविष्यकालीन घडामोडीसाठी कसा उपयुक्त पडला इत्यादी बाबीचा परामर्श घेणार आहे.

प्रकरण ३.भारतीय स्वातंत्र्य लढा आणि त्यातील पंडित जवाहरलाल नेहरुंचे योगदान

प्रस्तुत प्रकरणात नेहरूंचे विद्यार्थी दशेतून सार्वजनिक जीवनात आगमन, कॉंग्रेसचे सभासद, त्यांचा विविध आंदोलनातील सहभाग, वेगवेगळ्या चळवळीचे केलेले नेतृत्व त्यांनी भोगलेला तुरुंगवास व त्यात केलेले लिखाण, चाले जाव चळवळ, गांधी चळवळ, शेतकरी चळवळ, क्रिप्स कमिशन, सायमन 'गो बॅंक' भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठी केलेले कार्य, भारताचे स्वातंत्र्य, भारताची फाळणी, काश्मीर प्रश्न, हैद्राबाद संस्थान वरील पोलीस कार्यवाही, घटना निर्मितीतील योगदान, भारतातील हंगामी सरकार ते सत्ता स्थापनेपर्यंतचा कालखंड इत्यादी बद्दलचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घ्यायचा आहे.

प्रकरण ४. पंडित जवाहरलाल नेहरुंचे स्वातंत्र्योत्तर भारताच्या राजकीय विकासातील योगदान

प्रस्तुत प्रकरणात नेहरूंचा लोकशाही समाजवाद, धर्मनिरपेक्षता, संमिश्र अर्थव्यवस्था, संसदीय लोकशाहीची जडण – घडण, भाषावर आधारित प्रांत रचना इत्यादी बाबीचा आढावा घेणार आहे.

प्रकरण ५. पंडित जवाहरलाल नेहरू आणि त्यांचा दूरदृष्टीपणा

प्रस्तुत प्रकरणात, पंचवार्षिक योजना, पंचायती राज, परराष्ट्र धोरण, नियोजन आयोगाची भूमिका, नवीन प्रशासकीय व्यवस्थेच्या बांधणीची जडण – घडण, भारताच्या संरक्षणा संबंधी नेहरुंची भूमिका, पाकिस्तान निर्मिती बदलची भूमिका, इ. बाबींचा आढावा घेण्याचा प्रयत्न करणार आहे.

प्रकरण ६. नेहरू कालखंडातील भारत आणि इतर देशांशी असलेला संबंध

प्रस्तुत प्रकरणात चीन, सोव्हियत रशिया, अमेरिका, पाकिस्तान, अफगाणिस्तान, श्रीलंका इतर प्रमुख देशांशी झालेले करार यांचा अभ्यास करून नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाची उपयुक्तता ठरली काय ? याचा अभ्यास करणार आहे.

प्रकरण ७. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या ध्येय धोरणाची आजची प्रस्तुतता

प्रस्तुत प्रकरणात नेहरूंच्या एकूण अंतर्गत आणि परराष्ट्र धोरणाची चिकित्सा करून त्या धोरणाची प्रस्तुतता आज आहे काय ? याची मांडणी करण्यात येईल.

प्रकरण ८. समारोप आणि निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणात निश्चित केलेल्या गृहीतकाच्या आधारे केलेल्या अभ्यासातून प्राप्त झालेला निष्कर्ष मांडण्यात येईल.

संदर्भ ग्रंथ सूची :

१) आगलावे प्रदीप, संशोधन पध्दती शास्त्रे व तंत्रे, विद्या प्रकाशन नागपूर.

२) गोडबोले माधव, जवाहरलाल नेहरूंचे नेतृत्व : एक सिंहावलोकन, राजहंस प्रकाशन, पुणे.

३) गोरे ना. ग., (अनुवाद) पंडित जवाहरलाल नेहरू आत्मकथा, कॅन्टीनेन्टल प्रकाशन पुणे.

४) कुलकर्णी अनिरुध्द, (अनुवाद) भारताचा शोध, कॅन्टीनेन्टल प्रकाशन पुणे.

५) डोओफोडे सुधाकर, हिंदुस्थानातील संस्थानाचे विलीनीकरण कसे झाले?, संगत प्रकाशन नांदेड.

६) मोरे शेषेराव, कॉंग्रेसने आणि गांधीजींनी अखंड भारत का नाकारला ?, राजहंस प्रकाशन पुणे.

७) राजूरकर ना. गो. व कुरुंदकर नरहर, पंडित नेहरू : एक मागोवा, पद्मगंधा प्रकाशन पुणे.

८) चव्हाण पंजाब, भारत निर्माता : जवाहरलाल नेहरू, निर्मल प्रकाशन नांदेड.

९) वऱ्हाडपांडे नि. र., नेहरू व नेहरूवाद, सुरभ्य प्रकाशन नागपूर.

संशोधक विद्यार्थी

चालीकवार राजेश सुभाष
अंबेकर नगर, नांदेड.

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. यु. डी. सावंत
संशोधन मार्गदर्शक,
राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड.
ता. मुदखेड जि. नांदेड.